

कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना विवेक सावंत. समवेत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कौस्तुभ गावडे, नामदेवराव कांबळे, श्रीराम साळुंखे आदी. (छाया : मिलन मकानदार)

# बदलत्या काळासाठी स्वतःला तयार करा : विवेक सावंत

## डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'एआय' माणसाची जागा घेणार नाही; मात्र एआयचा प्रभावी वापर करणारा माणूस इतरांची जागा घेऊ शकतो. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःला तयार करण्याचे आवाहन आयटी शिक्षणतज्ज्ञ विवेक सावंत यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था येथे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३९ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि भविष्यातील शिक्षण' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. सावंत म्हणाले, एआयमुळे शिक्षण, उद्योग, संशोधन व दैनंदिन जीवनात मोठे बदल होत आहेत. माहितीचे विश्लेषण, सर्जनशील विचार, योग्य प्रश्न विचारण्याची क्षमता व निर्णयक्षमता विकसित करणे ही काळाची गरज आहे.

प्राचार्य साळुंखे म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षणविचारांचा वारसा जपत गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार व सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधण्यावर भर दिला. याप्रसंगी संस्थेच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय पुरस्कारांचे वितरण झाले.

'माझी शाळा-सर्वोत्कृष्ट शाळा' पुरस्कार सिद्धनाथ हायस्कूल, आरवडे व छत्रपती शिवाजी हायस्कूल, मोर यांना प्रत्येकी दोन लाख रुपये व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आला. प्रभारी सचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील व डॉ. कविता तिवडे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य सीताराम गवळी यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे आदी उपस्थित होते.

सकाळ कोल्हापूर, रविवार, ९ ऑगस्ट २०२६

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

**(273405SC017)**

## पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरती जाहिरात - 2026

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर (273405SC017) या शैक्षणिक व्यवस्थापनाकडील प्राथमिक शाळांमधील - ३ पदे (मुलाखतीसह), माध्यमिक विद्यालय- ४३० पद (मुलाखतीशिवाय) या निवड प्रकारातून निवड करुन नेमणूक करण्यासाठी पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार पवित्र पोर्टलमार्फत पात्र उमेदवारांकडून दि. ११/०८/२०२६ पर्यंत प्राधान्यक्रम घेण्यात येत आहे.

व्यवस्थापनाची सविस्तर जाहिरात व सूचना पाहण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे https://tait2025.mahateacherrecruitment.org.in/ या पवित्र पोर्टलच्या संकेतस्थळास भेट द्यावी. विहीत केलेल्या पात्रताविषयक अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांनी व्यवस्थापनांचे प्राधान्यक्रम दिलेल्या विहीत मुदतीत नोंद (Lock) करावेत. तसेच पवित्र पोर्टलवरील सुचनांप्रमाणे वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही करावी.

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : ०८/०८/२०२६

सचिव
**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर**